# देहुतील विद्यार्थ्यांची पोलिसांशी 'थेट भेट' ; संवादातून जागृती

**पिंपरी –** पंख सामाजिक संस्था आणि क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'जीवनमूल्य प्रकल्पां'तर्गत देहू येथील रयत शिक्षण संस्थेच्या संत तुकाराम व संत जिजाबाई विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'पोलिसांशी थेट भेट' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. छेडछाड, पॉस्को कायदा, प्रेम-मैत्री, आकर्षण व कायदा या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. क्विक हिल टेक्नॉलॉजीच्या मानव संसाधन उपाध्यक्षा अनुपमा काटकर, देहूरोड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शाहीद पठाण, उषा दळे, उज्ज्वला धनवट, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, क्विक हील फाउंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के आदी उपस्थित होते. पंख संस्थेचे समुपदेशक क्षितीज शिर्के, सचिन करंजुले यांनी प्रेम मैत्री आकर्षण वर 'रोल प्ले' सादर केले. संत तुकाराम विद्यालयाचे मुख्याध्यापक ईश्वर जगताप व संत जिजाबाई विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शुभांगी पंडित यांनी संयोजनात पुढाकार घेतला.

प्रभात Mon, 03 September 2018
epaper.eprabhat.net/c/31830049